अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ११ जानेवारी २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १०४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

लक्ष विचलित करून २० हजारांची रक्कम पळवली

सोलापूर : तरुणाचे लक्ष विचलित करून २० हजाराची रक्कम चोरून नेली. ही ८ जानेवारी रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास एमआयडीसी रोड येथे घडली. याप्रकरणी श्रीकांत राजेश खुनी (वय-२०,रा.राजरत्न नगर,नीलम नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. श्रीकांत हे विज बिल व टेलिफोन भरणा करत होते. त्यावेळी अचानक एक अज्ञात इसम त्यांच्या केबिनमध्ये आला व सुट्टे पैसे पाहिजे अशी विचारणा केली.त्यावेळी श्रीकांत यांनी पन्नास रुपयांचे सुट्टे पैसे दिले.त्यानंतर तो इसम थोड्यावेळ बाहेर थांबला व परत श्रीकांतजवळ आला. त्यावेळी श्रीकांत काउंटर वरती विज बिल भरणा करत होते. त्या इसमाने श्रीकांतचे लक्ष विचलित करून वीस हजार रुपयांची रक्कम चोरून नेली आहे. तपास पो.हे.कॉ. पाटील हे करीत आहेत.

प्रेमायण घडवले, 'दिवटी'ला अवदसा सुचली!
जन्मदाता यमसदनी, स्वत: तुरुंगात खितपत पडली!

सोलापूर/खास प्रतिनिधी

'प्रेमाला उपमा नाही, प्रेम देवाचे घरचे देणे'असे जरी म्हटले जात असले तरी समाज, नातेवाईक तसेच भावकी यांच्यामध्ये मान खाली घालायला लावणारे, घराण्याची इज्जत, अब्रु धुळीला मिळविणाऱ्या शिवाय नातेसंबंधांना पूर्ण विराम देणाऱ्या 'प्रेमा'चा विषय अवघड ठरतो. असाच प्रकार माढ्यात झाला. नादान मुलीने 'प्रेमायण' घडवले. इतर जातीतल्या तरूणाबरोबरच्या प्रेमाला विरोध करणाऱ्या जन्मदात्याचा कायमचा काटा काढण्याची अवदसा मुलीच्या डोक्यात शिरली. त्यातून जन्मदात्या पित्याचे जीवनच संपवून टाकले. जन्मदात्या पित्याचा काटा काढणाऱ्या दिवटी मुलीवर तुरुंगात खितपत पडण्याची वेळ आली. दिवटीच्या अविचारी प्रेमप्रकरणात अख्खे कुटुंब उद्ध्वस्त झाले. 'प्रेम' या अडीच अक्षरी शब्दाने काय वाताहात होते, याचा साक्षात्कार समाजमनाला पुन्हा झाला

▸▸ अख्खं कुटुंब उद्ध्वस्त झालं ▸▸ माढ्याच्या महेंद्र शहा परिवाराची अधुरी कहाणी

त्याचे झाले असे की, माढ्यातील प्रसिध्द व्यापारी महेंद्र शहा यांची मुलगी साक्षी हिचे याच शहरातील चैतन्य कांबळे या तरुणासोबत प्रेमसंबंध जुळले होते. आयुष्याचा जोडीदार म्हणून साक्षी हिने चैतन्यला निवडण्याचे ठरविले होते. साक्षी आणि चैतन्य या दोघांनी लग्नाच्या बेडीत अडकण्याचा निर्णय पक्का केला होता.

साक्षीने मी चैतन्यसोबत लग्न करणार आहे, हे घरच्यांना सांगितले होते. वडील महेंद्र शहा यांना हे लग्न मान्य नव्हते. त्यांनी साक्षीला आंतरजातीय लग्न करु नको, असे समाजवले होते. मात्र, चैतन्यसोबतच्या प्रेमात अखंड बुडालेल्या नादान साक्षीला पिता महेंद्र शहा यांनी विरोध करणे मान्य नव्हते. साक्षीने आंतरजातीय विवाह केल्यास समाज, नातेवाईक, भावकी, सगेसोयरे यांच्यापुढे इज्जत जाईल, बेअब्रू होईल, शरमेने मान खाली घालावी लागेल म्हणून वडील महेंद्र शहा यांनी साक्षीच्या लग्नाला कडाडून विरोध केला.

दरम्यान, याच टप्यावर लग्नाला विरोध करणाऱ्या वडिलांचा कायमचा काटा काढल्यास आपल्या मर्जीप्रमाणे चैतन्य कांबळे या प्रियकरासोबत लग्न करता येईल, हे ठरवून साक्षी आणि चैतन्य यांनी महेंद्र शहा यांचा कायमचा काटा काढण्याचा डाव आखला. जन्मदात्या पित्यास कायमचे संपविण्याची सुपारी साक्षी हिने दिली

साक्षी शहा — मृत महेंद्र शहा

होती. त्यानुसार, ९ ऑगस्ट २०२३ रोजी वडाची वाडी येथे महेंद्र शहा यांच्यावर हल्ला झाला होता. त्या जीवघेण्या हल्ल्यात शहा हे जायबंदी झाले होते. त्यांचा तब्बल १७ महिन्यांनी अखेर मृत्यू झाला.

वडिलांच्या हत्याप्रकरणात साक्षी तसेच तिचा प्रियकर चैतन्य कांबळे आणि सुपारी घेणारे संशयित आतिष लंकेश्वर, मयूर

चंदनशिवे, आनंद ऊर्फ बंड्या जाधव, राम पवार हे सध्या कोल्हापूर येथील कळंबा कारागृहात आहेत, त्यांना अद्याप जामीन मिळालेला नाही.

महेंद्र शहा यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणात साक्षीही तुरुंगात आहे. मात्र, तिच्या वडिलांचा मृत्यू झाल्याने आता तिच्यावर मनुष्यवधाचे कलम लावले जाणार आहे. आरोप पत्रात आता भारतीय दंडसहितेनुसार कलम वाढणार आहे. वडिलांवरचा हल्ला आणि त्यातून त्यांचा झालेला मृत्यू हे प्रकरण तिला शिक्षेपर्यंत पोचवू शकते. प्रसंगी तिला आयुष्यभर तुरुंगात खितपत पडावे लागेल, असे विधी तज्ज्ञांना वाटते. जन्मदाता पितापण कायमचा गेला आणि मुलगी तुरुंगात राहिली. नादान मुलीमुळे अख्खे कुटुंब उध्वस्त झाले. शहा परिवाराची अधुरी कहाणी घडली.

चूक म्हणायची तर कोणाची? : साक्षी हिने जातीचालीच्या भिंती तोडत आपल्यासाठी चैतन्य याला आयुष्याचा जोडीदार करण्याचे ठरविले होते. हा निर्णय घेण्याइतपत ती सज्ञान होती, सक्षम होती. भावनेच्या भरात निर्णय घेणारी नव्हती, असे सांगितले गेले. तर दुसरीकडे आपल्या लाडक्या मुलीने असे काही करु नये की आपली समाजात, नात्यागोत्यात, भावकीत, गावात इज्जत, अब्रू जाऊ नये, संबंधित चैतन्य मुलाने मध्येच तिला सोडून दिले तर आपल्या मुलीचे आयुष्य उद्धवस्त होईल, ती आयुष्यातून उठेल, या भितीपोटी पोक्त विचाराने महेंद्र शहांनी साक्षीच्या आंतरजातीय विवाह करण्याला विरोध केला. यात त्यांचे तरी काय चुकले? अशी चर्चा माढ्याच्या समाजमनात आहे.

शहा कुटुंब सावरणार तरी कसे?

सुपारी देऊन वडिलांवर हल्ला करायला लावण्याच्या प्रकरणात सतरा महिन्यांपासून मुलगी साक्षी कोल्हापूरच्या तुरुंगात आपल्या कर्माची शिक्षा भोगतेय. तर हल्यात जखमी झालेल्या घराचा पोशिंदा पिता सतरा महिन्यांनतर स्वर्गवासी झाला. या दोन्ही घटनांमुळे घराची अक्षरश: वाताहात झाली. शहा परिवारातील सदस्यांना सावरणार कोण आणि ते कसे सावरतील? त्यांच्यावर कोसळलेल्या दु:खाच्या डोंगरातून ते बाहेर कसे पडतील, हे प्रश्न अनुत्तरीत राहातानाच, माढ्याचे प्रसिद्ध व्यापारी महेंद्र शहा यांच्या परिवाराच्याबाबतीत जे काही भयावह घडलं आहे, त्यांनं या शहराचं, तालुक्याचं समाजमन चिंतातूर आहे, हे मात्र नक्कीच.

तैलाभिषेकाने उद्यापासून श्री सिध्दरामेश्वर यात्रेस प्रारंभ

सोलापूर : शिवयोगी श्री सिध्दरामेश्वरांच्या यात्रेस ६८ लिंगांच्या तैलाभिषेकाने रविवार १२ जानेवारीपासून प्रारंभ होत आहे. सोमवार १३ जानेवारीला संम्मती नंदीध्वजांचा अक्षता सोहळा आणि मंगळवार, १४ जानेवारीला होमविधी होणार आहे, अशी माहिती सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

रविवार, १२ जानेवारी रोजी ६८ लिंगांच्या तैलाभिषेकासाठी मानाचे सातही नंदीध्वज व पालखींची मिरवणूक हिरेहब्बू यांच्या वाड्यापासून निघणार आहे. सोमवार, १३ जानेवारी रोजी सकाळी आठ वाजता हिरेहब्बू यांच्या वाड्यापासून नंदीध्वज मिरवणुकीने श्री सिध्दरामेश्वर मंदिराकडे मार्गस्थ होतील. दुपारी साडेबारापर्यंत सुगडी पूजन व अन्य धार्मिक विधी होऊन नंदीध्वजांचा अक्षता सोहळा पार पडेल. मंगळवार, १४ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता हिरेहब्बू यांच्या निवासस्थानापासून मानाचे

सोमवारी अक्षता सोहळा तर मंगळवारी होमप्रदीपन

सातही नंदीध्वज होमप्रदीपन सोहळ्यासाठी मार्गस्थ होतील. रात्री नऊ वाजता मिरवणूक होम मैदानावरील होमकुंडाजवळ आल्यानंतर प्रतीकात्मक कुंभार कन्येच्या अग्निप्रवेशाचा कार्यक्रम पार पडेल. बुधवार, १५ रोजी होम मैदानावर शोभेच्या दारूकामाची आतषबाजी व प्रोजेक्टरव्दारे टुडी लेझर शो'चे नियोजन करण्यात आले आहे. गुरूवार, १६ रोजी उत्तर कसब्यातील श्री मल्लिकार्जुन मंदिरात मानाच्या नंदीध्वजांचे आगमन होईल. मंदिरास प्रदक्षिणा घातल्यानंतर नंदीध्वजांच्या वस्त्र विसर्जनाने व प्रसाद वाटपाने यात्रेतील धार्मिक कार्यक्रमांची सांगता होणार असल्याचे काडादी यांनी सांगितले.

सुवर्ण सिध्देश्वर संकल्पनेतील पहिल्या टप्यात मंदिराच्या शिखराच्या वरील दोन घुमुटास सोन्याचा मुलामा देण्याचे काम पूर्ण झाल्याची माहिती काडादी यांनी दिली.

पत्नी, सावत्र आईच्या खून प्रकरणातील आरोपीस जन्मठेप

बार्शी : पत्नी, सावत्र आई व मुलाच्या खून प्रकरणातील आरोपीस येथील सत्र न्यायालयाने खुनाचा प्रयत्न व खून प्रकरणी दोषी धरून जन्मठेप व दंडाची शिक्षा ठोठावली. अनिरुद्ध व्यंकट बरडे (रा कोरफळे, ता बार्शी) असे आरोपीचे नाव आहे.

बार्शी तालुक्यातील कोरफळे येथील आरोपी अनिरुद्ध बरडे याने त्याच्या घरी सतत होत असलेल्या बायको व सावत्र आईच्या भांडणाला कंटाळून ९ फेब्रुवारी २०१७ रोजी आई सखुबाई व मुलगा सुदर्शन यांना हातोड्याने मारून जागीच ठार केले. पत्नी रेश्माच्या अंगावर रॉकेल

सन २०१७ मधील कोरफळे येथील प्रकरण

टाकून पेटवून दिले. दुसरा मुलगा अविनाश व मुलगी प्रतीक्षा यांनाही कुकरीने मारून जखमी केले. त्यानंतर स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. आरोपीचे वडील व्यंकट बरडे यांनी अनिरुद्ध वैराग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सरकार पक्षाच्या वतीने १६ साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी पक्षाचा पुरावा याचा विचार करता जिल्हा व

अनिरुद्ध बरडे

सत्र न्यायाधीश एल.एस चव्हाण यांनी आरोपी अनिरुध्द व्यंकट बरडे (रा कोरफळे, ता. बार्शी) यास जन्मठेप व १ लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. सरकार पक्षातर्फे राजश्री कदम यांनी काम पाहीले. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार कुणाल पाटील, स.पो.फौ शशिकांत आळणे यांनी वेळोवेळी साक्षीदार, पुरावे हजर ठेवण्याचे काम पाहिले. केसमध्ये बार्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल व वैरागचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.

टेम्पोचे टायर फुटल्याने अपघात; एक ठार; दोन गंभीर जखमी

बार्शी : बार्शी-लातूर रस्त्यावर यारीपुरी गावाजवळील साई मंदिराजवळ वीट वाहतूक करणाऱ्या टेम्पोचा टायर फुटल्याने वाहनाचा तोल सुटून अपघात झाला.

या दुर्घटनेत एका व्यक्तींचा मृत्यू झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात ९ जानेवारी रोजी सायंकाळी ६.१० वाजता घडला. महादेव रामलिंग डमरे (वय ४७ वर्षे, रा. सुभाषनगर, तालुका बार्शी) यांचा जागीच मृत्यू झाला.

टेम्पोमध्ये असलेले प्रतीक बाबासाहेब ढोले (रा. सुभाषनगर, बार्शी) आणि नागनाथ खराडे (पत्ता उपलब्ध नाही) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने उपचारासाठी जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथे दाखल करण्यात आले. वाहनातील विटांचा अतिरिक्त भार आणि टायर फुटल्याने वाहनाचा तोल गेला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे.

सोलापूर : पूर्व भागातील श्री वेंकटेश्वर मंदिरात वैकुंठ एकादशीनिमित्त मंदिरात आकर्षक फुलांची सजावट पाहून दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या डोळ्याचे पारणे फिटले.

सोलापूर : ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रेनिमित्त शुक्रवारी शेटे यांच्या वाड्यात सिद्धेश्वरांच्या योगदंड पूजेचा सोहळा शुक्रवारी भक्तीभावांने पार पडला.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

अरे, 'वरुन' ऑर्डर येईपर्यंत तरी शांत रहा!

कल्याण
350-85-267

मुंबई
480-20-145

मंत्र्यांच्या गौप्यस्फोटाने शरद पवारांच्या राष्ट्रवादीत खळबळ

संजय शिरसाट म्हणाले की, महाविकास आघाडीत मुद्दाम मिठाचा खडा टाकणारे पहिले संजय राऊत होते. महाविकास आघाडी आता राहणार नाही. त्यांना काँग्रेससोबत जाण्याची गरज वाटत नाही. शरद पवारांची भूमिका दिवसेंदिवस बदलताना आपण पाहतोय. याचा अर्थ असा होतो की, आता आपल्याला सत्तेत जायचे आहे. सत्तेशिवाय जे राहू शकत नाही, त्यांचे मन परिवर्तन होऊन ते युतीच्या किंवा अजित पवारांसोबत जाण्याचा प्रयत्न राहील. येत्या महिनाभरात हाच प्रयत्न तुम्हाला दिसून येईल. ज्यांच्या कधी आयुष्यात जमले नाही, त्या उबाठासोबत त्यांनी युती केली. पहाटेचा शपथविधीही यांनीच केला. भविष्यात यांचा वेध सत्तेच्या दिशेने आहे, जे सगळ्यांना जाणवतेय. येत्या महिनाभरात राष्ट्रवादीचा वेगळा अर्जेंडा तुम्हाला पाहायला मिळेल.

ठाकरे गटाची तडफड : ठाकरे गट काँग्रेस-राष्ट्रवादीला सोडत नाही पण ते ठाकरे गटाला सोडतायेत म्हणून आता तडफड चालू आहे. त्यांना जाणीव होऊ द्या, ते हात पुढे करत नाहीत मग टाळी द्यायची की नाही आम्ही ठरवू, असा टोला शिरसाट यांनी लगावला.

डॉ.कोल्हेंच्या विधानाने आघाडीत पडली ठिणगी

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

मागील अनेक दिवसांपासून राज्याच्या राजकारणात विविध चर्चांना जोर आला आहे. त्यात प्रामुख्याने शरद पवार आणि अजित पवार पुन्हा एकत्रित येतील अशी एक चर्चा होती. शरद पवारांनी या चर्चेला ठामपणे नकार दिला असला तरी दिल्लीतील गाठीभेटी आणि खासदारांच्या फोडाफोडीच्या बातम्या थांबल्या नाहीत. त्यातच शिंदे गटाच्या शिवसेनेतील एका मंत्र्याने शुक्रवारी मोठा गौप्यस्फोट केल्याने पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. केलेल्या दाव्याने राजकीय खळबळ माजली आहे. लवकरच शरद पवार गट राज्याच्या सत्तेत सहभागी होईल, असा दावा शिवसेना मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे.हे कमी म्हणून की काय.शरद पवारांच्या गटातील खासदार डॉ.अमोल कोल्हे यांच्या एका विधानाने महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडली आहे. जशास तसे म्हणतात, त्याप्रमाणे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आणि काँग्रेसने त्याच भाषेत डॉ. कोल्हे यांना प्रतिउत्तर दिले आहे.

ठाकरे गट जागा व्हायला तयार नाही : कोल्हे म्हणाले की, राज्याची सध्याची परिस्थिती पाहिली तर ठाकरे गट झोपेतून जागा व्हायला तयार नाही. त्यासोबत पराभवानंतर काँग्रेसची मोडलेली पाठ सरळ व्हायला तयार नाही. आपल्याकडे लढणारे शरद पवार आहेत, आता आपल्याला लढायला संधी आहे. सध्या विरोधी पक्षात मोठी जागा शिल्लक आहे. त्यामुळे बचेंगे तो और भी लढेंगे असे विधान त्यांनी पक्षातील आढावा बैठकीत कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांसमोर केले. मात्र त्यांच्या याच विधानाने महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पेटली आहे.

वडेवट्टीवार यांचा टोला...

राज्यातील सरकार झोलझाल करून आलेले आहे. जनतेच्या दिलेल्या बहुमतातून हे सरकार आले नाही. या सरकारने ईव्हीएम च्या भरवशावर सत्ता मिळवली आहे. महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष आपापल्या परीने काम करतायेत. अमोलरावांनी आपल्या पक्षाकडे थोडे अधिक लक्ष द्यावे, आम्हाला सल्ला कमी द्यावा असा टोला काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी कोल्हेंना लगावला.

राऊतांनी देखील सुनावले

दरम्यान, महाराष्ट्रात बचेंगे तो और लढेंगे ही भूमिका कायम शिवसेनेने घेतली आहे याचा अर्थ आम्ही राहिलो नाही असं नाही. आम्ही जमिनीवरच आहोत. लढणाऱ्यांचा आमचा पक्ष आहे. आम्ही कधी झुकलो नाही, वाकलो नाही, मोडलो नाही. आमचे २० आमदार आहेत त्यातील एकाचेही म्हणणं नाही की आपण समोर फुटलेल्या गटात सहभागी व्हायचे आणि सत्तेची ऊब घ्यायची हे आमच्यात कुणी सांगत नाही. त्यामुळे आम्ही उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात लढत राहू अशा शब्दात अमोल कोल्हे यांना खासदार संजय राऊत यांनी सुनावले आहे.